नगर परिषद/नगर पंचायती सार्वत्रिक निवडणुका-२०१६-१७
मुख्य निवडणूक निरीक्षक व निवडणूक निरीक्षक यांच्या नेमणुकीबाबत...

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक : रानिआ/नप-२०१६/प्र.क्र. ३०/का-६,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १४ ऑक्टोबर, २०१६.

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)

विषय:- **नगर परिषदा/नगर पंचायती सार्वत्रिक निवडणूक- २०१६-१७ -**
मुख्य निवडणूक निरीक्षक व निवडणूक निरीक्षक यांच्या नेमणुकीबाबत...

महोदय,

आपल्याला माहितच आहे की, सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (नगर परिषदा/नगरपंचायतींसह) सार्वत्रिक निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची संपूर्ण जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाच्या वतीने जिल्हाधिकारी व पर्यवेक्षक अधिकारी म्हणून विभागीय आयुक्त यांची आहे.

२. निवडणुकीच्यावेळी सर्व स्तरावर प्रामुख्याने निवडणूक निर्णय अधिकारी व मतदान केंद्राध्यक्ष स्तरावर नियमाप्रमाणे काम होत आहे किंवा कसे हे तपासण्यासाठी गेल्या अनेक निवडणुकांपासून स्वतंत्र निवडणूक निरीक्षक नेमण्याची पध्दत राज्य निवडणूक आयोगाने सुरु केलेली आहे.

३. मतदारांना प्रभावित करण्यासाठी राजकीय पक्ष व उमेदवार अनेक कल्पक योजना हाती घेऊन पैसा, मद्य व इतर वस्तूंचे वाटप करतात असे काही निवडणुकांमध्ये लक्षात आल्यावर भारत निवडणूक आयोगाने त्यांच्यावर बंधन आणण्याच्या दृष्टीने अनेक उपाययोजना सुरु केल्या आहेत.

उदा. खर्चासाठी विशेष निरीक्षकांची नियुक्ती, प्रत्येक पोलीस स्टेशनवर भरारी पथक (Flying Squad), व्हिडिओग्राफी सर्व्हेलियन्स पथक, इत्यादी.

४. भारत निवडणूक आयोगाच्या धर्तीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये खर्चावर नियंत्रण ठेवणे व मतदारांना देण्यात येणाऱ्या प्रलोभनास आळा बसविणे आवश्यक आहे.

५. राज्य शासनाने "महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१६ (सन २०१६ चा अध्यादेश क्रमांक ९)", दिनांक १९/०५/२०१६ अन्वये तसेच "महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१६ (सन २०१६ चा अध्यादेश क्रमांक १६)", दि.३०/०८/२०१६ रोजी पारित करुन नगरपरिषदांमध्ये (नगरपंचायत वगळून) एक सदस्यीय पध्दतीऐवजी बहुसदस्यीय प्रभाग पध्दती व नगरपरिषदांच्या नगराध्यक्षांची थेट निवड करण्याची पध्दती निश्चित केलेली आहे,

६. वरील बाबींचा (खर्च, प्रलोभन, बहुसदस्यीय प्रभाग पध्दती व नगराध्यक्ष थेट निवडणूक इत्यादी) विचार करुन नगर परिषद/नगर पंचायतींच्या निवडणुकांकरिता निवडणूक निरीक्षकांबाबत नव्याने आदेश निर्गमित करण्याची बाब राज्य निवडणूक आयोगाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन राज्य निवडणूक आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

## आदेश

७. (i) विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी नगर परिषद/नगर पंचायतींच्या निवडणुकांसाठी राज्य निवडणूक आयोगाच्या वतीने स्वतंत्र निवडणूक निरीक्षक म्हणून अतिरिक्त जिल्हाधिकारी यांची नेमणूक करावी.

(ii) नगरपालिकेचे क्षेत्र, आकार व संवेदनशीलता लक्षात घेऊन जास्तीत जास्त ३ नगरपरिषदा/नगर पंचायतीकरिता १ याप्रमाणे निवडणूक निरीक्षक यांची नेमणूक करावी. हे करताना त्यांना सर्व नगर परिषद/नगर पंचायतींना एका दिवसात सहजरित्या भेट देता येईल, अशा रीतीने नियोजन करावे.

(iii) जर विभागामध्ये आवश्यकतेप्रमाणे अतिरिक्त जिल्हाधिकारी उपलब्ध नसतील तर विभागातील अनुक्रमे वरिष्ठ उप जिल्हाधिकारी, इतर शासकीय विभागाच्या समकक्ष वर्ग-१ चे अधिकारी व जिल्हा परिषदेमध्ये असलेले वरिष्ठ वर्ग-१ अधिकारी, यांची नेमणूक करावी.

(iv) प्रामाणिक, संशयातीत सचोटी व निवडणुकीचा अनुभव असलेल्या अधिकाऱ्यांची निवडणूक निरीक्षक म्हणून नेमणूक करावी.

(v) ज्या ठिकाणी २ किंवा त्यापेक्षा जास्त निवडणूक निरीक्षक आहेत तेथे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची मुख्य निवडणूक निरीक्षक म्हणून नियुक्ती करावी.

(vi) मुख्य निवडणूक निरीक्षक यांच्यावर त्यांच्या जिल्हयातील निवडणूक निरीक्षक यांच्या कामकाजाच्या पर्यवेक्षणाची जबाबदारी राहील.

८. जिल्हाधिकारी यांनी मुख्य निवडणूक निरीक्षक/निवडणूक निरीक्षक यांचे नाव, पद, दुरध्वनी क्रमांक, मोबाईल क्रमांक,भेटीचा दिनांक,भेटीच्या दरम्यान राहण्याचे ठिकाण इत्यादी तपशिल क्षेत्रातील मतदारांच्या माहितीकरिता जाहीर सूचनेव्दारे (स्थानिक वृत्तपत्रात) प्रसिध्द करावा..

९. सर्व निवडणूक निरीक्षकांनी (मुख्य निवडणूक निरीक्षकांसह) निवडणुकीच्या काळात (नामनिर्देशनापासून निकाल लागेपर्यंत) त्यांना नेमून दिलेल्या नगर परिषद/नगर पंचायतींना वेळोवेळी भेटी देऊन सर्व आवश्यक बाबींवर लक्ष ठेवावे. उदा :-

९.१ **सर्व व्यवस्था -**

(i) बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीमुळे वाढलेली सर्व मतदान केंद्रे शासकीय इमारतीत आहेत किंवा कसे, शासकीय इमारत उपलब्ध नसेल तर राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्रमांक-रानिआ-२०१५/प्र.क्र.९/प्रकल्प कक्ष, दिनांक २७/०५/२०१५ नुसार कार्यवाही करण्यात आली आहे किंवा कसे,

(ii) सर्व मतदान केंद्रे सुस्थितीत आहेत किंवा कसे,

(iii) सर्व मतदान केंद्रावर आवश्यक ती सोयी-सुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे, उदा. सुव्यवस्थित खोल्या, शौचालय, पिण्याचे पाण्याची सोय, वीज, रॅम्प, इत्यादी.

(iv) निवडणूक प्रक्रिया योग्य रितीने पार पाडण्यासाठी आवश्यक तो अधिकारी/कर्मचारीवर्ग नेमण्यात आला आहे किंवा कसे,

(v) आवश्यक वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहे किंवा कसे,

(vi) बहुसदस्यीय प्रभाग पध्दती व नगराध्यक्षाच्या थेट निवडणुकींच्या अनुषंगाने सर्व अधिकारी/कर्मचारी यांना योग्य ते प्रशिक्षण देण्यात आले आहे किंवा कसे,

(vii) सर्व संबंधित विभाग व यंत्रणा यांच्यासोबत योग्य तो समन्वय साधण्यात आला आहे किंवा कसे, (उदा. गृह विभाग, उत्पादन शुल्क, आयकर, सेल्स टॅक्स, बँका, विद्यापीठे, प्रादेशिक परिवहन, इत्यादी.)

(viii) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे ठेवण्यासाठी स्ट्राँग रुमची व्यवस्था व मतमोजणीकरिता योग्य ती व्यवस्था करण्यात आली आहे किंवा कसे,

९.२ **मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी उपाययोजना-**

(i) मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी सर्व संबंधित विभाग व संस्था यांची मदत घेण्यात येत आहे किंवा कसे, (उदा. विद्यापीठे, महाविद्यालये, अशासकीय संस्था व उद्योग समूह, इत्यादी.)

(ii) मोठ्या प्रमाणावर योग्य रितीने जनजागृती मोहीम राबविण्यात आली आहे किंवा कसे,

९.३ आदर्श आचारसंहितेच्या प्रभावी अंमलबजावणीसोबत खर्चावर नियंत्रण ठेवणे, आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे, मतदारांवर प्रभाव टाकणाऱ्या वस्तूंचे वाटप इत्यादींवर अंकुश ठेवण्यासाठी उपाययोजना करण्यात आली आहे किंवा कसे, उदा.

(i) जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली "निवडणूक संनियंत्रण समिती"ची स्थापना करण्यात आली आहे किंवा कसे, तसेच या समितीची बैठक आवश्यकतेप्रमाणे घेण्यात येते किंवा कसे,

(ii) समितीने आवश्यक तो सर्व विषयावर शास्त्रोक्त आराखडा तयार केला किंवा कसे, उदा :-

(अ) कायदा व सुव्यवस्था राखणे- प्रतिबंधात्मक उपाययोजनांसह (संवेदनशील, नक्षलग्रस्त, इत्यादी भागांसाठी विशेष व्यवस्था)

(ब) आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे,

(क) मतदारांवर प्रभाव टाकण्याकरिता देण्यात येणाऱ्या वस्तूंच्या वाटपावर अंकुश ठेवणे.

(ड) रोख रकमांच्या मोठया व्यवहारावर सर्व संबंधित ठिकाणी उदा. विमानतळ, रेल्वे स्थानक, हॉटेल्स, फार्म हाऊस यांच्यावर नजर ठेवणे.

(इ) तारण, वित्तीय, हवाला दलाल (Pawn Brokers, Financial Brokers, Hawala Agents) यांचे व्यवहार व हालचालींवर लक्ष ठेवणे.

(फ) बँकांमार्फत होणाऱ्या मोठ्या व संशयास्पद आर्थिक व्यवहारांवर लक्ष ठेवणे.

(ग) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.१/का-५, दिनांक १६/०१/२०१२ नुसार पेड न्यूजबाबतच्या समितीच्या कामाचा आढावा घेणे. त्याचबरोबर सोशल मीडिया व इंटरनेट इत्यादींवर लक्ष ठेवणे.

(iii) वरील बाबींवर लक्ष ठेवण्यासाठी खालील उपाययोजना करण्यात आल्या किंवा कसे, उदा.-

(अ) आवश्यकतेनुसार व्हिडिओग्राफी व ती तपासण्याकरिता समिती.

(ब) पोलीस स्टेशनमध्ये भरारी पथकाची स्थापना (Flying Squad)

(क) नाक्यासाठी Surveillance Team

(ड) तक्रार निवारण कक्षाची स्थापना.

९.४ निर्भय, मुक्त व पारदर्शक निवडणुका होण्यासाठी इतर सर्व आवश्यक उपाययोजना करण्यात आली आहे किंवा कसे,

९.५ निवडणुकीमध्ये सर्व पक्ष व उमेदवार यांना एकसमान संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे किंवा कसे, (उदा. टी.व्ही., रेडिओ, होर्डिंग्ज, वर्तमानपत्रे, इत्यादी)

१०. निवडणूक निरीक्षक यांनी त्यांना देण्यात आलेल्या नगर परिषद/नगर पंचायत क्षेत्रामध्ये खाली दर्शविल्याप्रमाणे कमीत कमी ६ दिवस भेटी व ६ रात्री मुक्काम करून योग्य ती कार्यवाही करावी :-

(i) उमेदवारांची यादी अंतिम होण्याच्या आदल्या दिवशी (पूर्वसंध्येस) मुक्काम करावा व उमेदवारांची यादी अंतिम होण्याच्या कार्यवाहीवर लक्ष ठेवावे. (१ रात्र + १ दिवस)

(ii) मतदानापूर्वी दोन दिवस आधीपासून मतमोजणीपर्यंत मुक्काम करावा.
(३ रात्री + ३ दिवस)

(iii) या शिवाय, प्रचारादरम्यान कमीत कमी दोन दिवस, दोन रात्री सलग मुक्काम करणे.
(२ रात्री + २ दिवस)

११. ज्या जिल्हयात मुख्य निवडणूक निरीक्षक व निवडणूक निरीक्षक दोन्ही असतील तेथील कामाचे, भेटींचे व रात्रीच्या मुक्कामाचे नियोजन मुख्य निवडणूक निरीक्षक यांनी करावे.

१२. निवडणूक निरीक्षक व मुख्य निवडणूक निरीक्षक यांनी केलेल्या कामाचा अहवाल कमीत कमी ३ वेळा (वर नमूद केल्याप्रमाणे) संबंधित विभागीय आयुक्त यांच्यामार्फत राज्य निवडणूक आयोगाकडे २४ तासात प्राप्त होईल या बेताने पाठवावा. आवश्यकता वाटल्यास त्यांना अधिकचे अहवाल पाठविण्याची मुभा राहील.

१३. मुख्य निवडणूक निरीक्षक व निवडणूक निरीक्षक यांच्यासाठी मार्गदर्शक सूचना परिशिष्ट-१ प्रमाणे राहतील.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( एस. एम. चन्ने )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग

C:\Users\Anagha.Bhoraokar\Desktop\निवडणूक निरीक्षकांसाठी मार्गदर्शक सूचना - १ dt. १३.१०.२०१६.docx

# परिशिष्ट – १

## मुख्य निवडणूक निरीक्षक व निवडणूक निरीक्षकांसाठी मार्गदर्शक सूचना

संबंधित निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक रितीने पार पाडण्याची सर्व जबाबदारी संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी व त्यांच्या अधिनस्त सर्व अधिकाऱ्यांची आहे. मात्र, आवश्यक ती सर्व उपाययोजना जिल्हाधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी, नगर परिषदा / नगर पंचायतींचे प्रशासक/मुख्याधिकारी व संबंधित अधिकाऱ्यांकडून केली जाते किंवा नाही, तसेच पक्ष/उमेदवार यांची राज्य निवडणूक आयोगाच्या वतीने तपासणी करणे ही मुख्य निवडणूक निरीक्षक/निवडणूक निरीक्षकाची जबाबदारी राहील. भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या सिध्दांताप्रमाणे व राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनांप्रमाणे मुख्य निवडणूक निरीक्षक/निवडणूक निरीक्षकांनी योग्य ती कार्यवाही करावयाची आहे. त्यांना त्यांचे काम योग्य रितीने हाताळता यावे यासाठी उदाहरण म्हणून त्यांची जबाबदारी खाली नमूद करण्यात येत आहे:-

(१) मुख्य निवडणूक निरीक्षक व निवडणूक निरीक्षकांनी या निवडणुकीशी संबंधित सर्व कायदे, नियम व आयोगाने निर्गमित केलेल्या आदेशांचा अभ्यास करावा व त्यांचे तंतोतंत पालन होते की नाही, हे तपासावे. जसे की,

- (i) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ व त्याअंतर्गत निवडणूक नियम -१९६६
- (ii) चिन्ह वाटपाबाबतचे आदेश
- (iii) आचारसंहितेबाबतचे आदेश

(२) आचारसंहितेच्या निदेशांचे पालन राजकिय पक्ष आणि उमेदवार, तसेच शासन यंत्रणा आणि अधिकारी यांचेकडून योग्य प्रकारे केले जाते किंवा कसे ? आयोगाच्या निदेशानुसार खालील नमूद व्यवस्था आवश्यक त्या संख्येने केली आहे किंवा कसे हे तपासणे.

- (अ) आवश्यकतेनुसार व्हिडिओग्राफी व ती तपासण्याकरिता समिती.
- (ब) पोलीस स्टेशनमध्ये भरारी पथकाची स्थापना (Flying Squad)
- (क) नाक्यासाठी Surveillance Team
- (ड) तक्रार निवारण कक्षाची स्थापना.

(३) संबंधित जिल्हाधिकारी आणि नगरपरिषद, मुख्याधिकारी यांनी राजकीय पक्षांच्या बैठका घेतल्या आहेत किंवा कसे ?

(४) नगरपरिषद क्षेत्रात आचार संहिता कालावधीत अवैध दारु वाटप होणार नाही याकरिता पर्याप्त उपाययोजना केली आहे किंवा कसे ?

(५) नगरपरिषदा/नगर पंचायतींची सर्व माहिती (उदा. हद्दी, प्रभाग, राजकीय परिस्थिती, मतदान केंद्रे, संवेदनशील मतदान केंद्रे, कायदा व सुव्यवस्था, दारुबंदी, निवडणूक साहित्य, इत्यादी) मुख्य निवडणूक निरीक्षक व निवडणूक निरीक्षकांनी निवडणूक निर्णय अधिकारी, मुख्याधिकारी नगर परिषद / नगर पंचायत यांचेशी चर्चा करून व प्रत्यक्ष भेटी देऊन समजावून घ्यावी.

(६) निवडणुकीशी निगडित होणाऱ्या महत्वाच्या बैठकांना मुख्य निवडणूक निरीक्षक वा निवडणूक निरीक्षकांनी शक्यतोवर व्यक्तिश: उपस्थित राहावे. जसे -

(अ) पोलीस आयुक्त/पोलीस अधिक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रादेशिक परिवहन अधिकारी, अधिक्षक (दारुबंदी), शैक्षणिक अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी, इत्यादींसमवेत बैठक.

(ब) राजकीय पक्षांसमवेत बैठक.

(क) मिडिया कमिटीसमवेत बैठक, इत्यादी.

(७) या निवडणुकीमध्ये संगणक प्रणालीचा योग्य तो वापर करण्यात आला आहे किंवा कसे? हे तपासावे. उदा.-

(i) सर्व नामनिर्देशनपत्रे व प्रतिज्ञापत्रे संगणकाच्या मदतीने भरण्यात आली किंवा कसे?

(ii) जिल्हाधिकारी यांनी सर्व मतदान केंद्राध्यक्ष, सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याशी सतत संपर्क साधण्यासाठी योग्य अशी उपाययोजना केली आहे किंवा कसे? (उदा. मोबाईल ॲप्लिकेशन्स, वॉट्स ॲप, एसएमएस, ई-मेल, इत्यादी)

(८) आयोगाच्या सूचनांप्रमाणे शेवटच्या क्षणाची वाट न पाहता उपस्थित असलेल्या सर्व ईव्हीएमची FLC वेळेपूर्वी करण्यात आली आहे किंवा कसे व सर्व ईव्हीएम व्यवस्थितपणे ठेवण्यात आली आहेत किंवा कसे इ.पहावे.

(९) निवडणूक निरीक्षक यांनी त्यांच्या क्षेत्रामध्ये जास्तीत जास्त मतदान केंद्रे व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयास भेट द्यावी. या भेटींच्या तारखांची त्यांनी योग्य ती प्रसिध्दी द्यावी.

(१०) मतदान व मतमोजणीसाठी नेमण्यात आलेले अधिकारी/कर्मचारी परवानगीशिवाय अनुपस्थित राहिल्यास त्यांच्याविरुध्द प्रशासकीय कारवाई करण्यात आली आहे किंवा कसे,

(११) प्रशिक्षण योग्य रितीने हाताळण्यात आले आहे किंवा कसे, हे बारकाईने तपासावे. यामध्ये प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश असावा :-

(i) मतदान केंद्रांच्या व्यवस्थेबद्दल सर्व माहिती

(ii) ईव्हीएम वापराबाबतची सर्व माहिती

(iii) माहिती व्यवस्थित रितीने व वेळेवर पाठविण्यासाठी असलेली व्यवस्था

(iv) आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी

(v) निर्भय, मुक्त व पारदर्शक निवडणुकांसाठी सर्व उपाययोजना, इत्यादी.

(१२) कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने सर्व प्रतिबंधात्मक उपाययोजना, पोलीस मनुष्यबळ, दारुबंदी करण्यात आली आहे किंवा कसे, याची तपासणी करावी.

(१३) आदर्श आचारसंहितेची काटेकोरपणे अंमलबजावणी होते किंवा कसे, याची तपासणी करावी. यामध्ये प्रामुख्याने खालील बाबींवर लक्ष द्यावे :-

(i) फलक काढणे, इत्यादी

(ii) अनधिकृत बांधकामे

(iii) मतदारांना अप्रत्यक्षपणे प्रलोभन देण्यात आले होते किंवा कसे?

(१४) निवडणूक निरीक्षक यांनी त्यांच्या भेटींमध्ये मतदान केंद्रे व त्यावरील उपलब्ध सोयी-सुविधा, ईव्हीएमसाठी तयार करण्यात आलेले स्ट्राँग रुम्स व मतमोजणीचे ठिकाण व त्यावरील सर्व व्यवस्थासुध्दा तपासावी.

(१५) निवडणूक निरीक्षकांना त्यांच्या भेटींच्या वेळी व इतर वेळी काही गैरकृत्ये आढळून आल्यास व त्याचा विपरीत परिणाम निर्भय, मुक्त व पारदर्शक निवडणुकांवर होण्याची शक्यता असेल तर त्याबद्दलची संपूर्ण माहिती त्वरीत सबंधित अधिकारी (निवडणूक निर्णय अधिकारी, मुख्याधिकारी व संबंधित पोलीस अधिकारी) यांच्या निदर्शनास आणावी आणि हे गैरकृत्य थांबविण्याबाबत सूचित करावे. तद्नंतरही गैरकृत्य थांबत नसेल तर त्याचा लेखी अहवाल राज्य निवडणूक आयोगास सादर करावा.

(१६) निवडणूक निरीक्षकांनी त्यांच्या भेटींचा अहवाल त्याच दिवशी मुख्य निवडणूक निरीक्षक यांना करावा.

(१७) एखाद्या प्रभागामध्ये फेरमतदान झाल्यास त्यावेळीसुध्दा वरीलप्रमाणे कार्यवाही करावी.

(१८) मुख्य निवडणूक निरीक्षक व निवडणूक निरीक्षकांनी खालील बाबी कटाक्षाने टाळाव्यात :-

(i) मुख्य निवडणूक निरीक्षक व निवडणूक निरीक्षक यांनी निवडणूक क्षेत्राला भेटी देताना त्यांच्या कुटुंबियांसोबत जाऊ नये.

(ii) मुख्य निवडणूक निरीक्षक/निरीक्षक यांनी प्रसार माध्यमांशी बोलू नये अथवा मुलाखत देवू नये.

(iii) अनावश्यक सोयी-सुविधांची मागणी करू नये.

(iv) राजकीय पक्षांच्या बैठका आपल्या स्तरावर आयोजित करण्यात येऊ नयेत.

(१९) निवडणुका योग्य रितीने पार पडल्यावर व सर्व अहवाल आयोगास सादर केल्यावर या आदेशाद्वारे देण्यात आलेली मुख्य निवडणूक निरीक्षकांची जबाबदारी पूर्ण होईल.

............................................................